# नव्या जगाची सुरुवात...

भानू काळे

**नव्या जगाची सुरुवात...**

■

लेखक :
भानू काळे
चलभाष : ९८५०८ १००९१
इमेल : bhanukale@gmail.com

■

© भानू काळे

■

प्रकाशक :
ऊर्मी प्रकाशन
सी २, गार्डन इस्टेट, नागरस रस्ता, औंध, पुणे ४११ ०६७
स्थिरभाष : (०२०) २५८८३७२६

■

मुद्रक : कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि.

■

अक्षरजुळणी : अमोघ आर्ट्स

■

आवृत्ती पहिली : २१ जून २०१८

■

किंमत : ४० रुपये

# प्रास्ताविक

'अंतर्नाद' मासिकाने आपल्या तेवीस वर्षांच्या वाटचालीत जे अनेक उपक्रम राबवले त्यातला एक म्हणजे 'नव्या जगाची सुरुवात स्वतःपासून होते' ही अभिनव जाहिरात-मालिका.

अंतर्नादचे प्रथमपासूनचे एक हितचिंतक व पूर्वी कमिन्स कंपनीचे चेअरमन असलेले अरुण किर्लोस्कर हे त्यांच्याशी निगडित असलेल्या तीन वेगवेगळ्या कंपन्यांच्या जाहिराती अंतर्नादसाठी देत असत. केवळ अंतर्नादला आर्थिक मदत करायची या हेतूने.

जाहिरातींचा मजकूर तयार करायची जबाबदारी त्यांनी माझ्यावरच सोपवली होती. त्यानुसार त्यांच्या जाहिराती वेळोवेळी प्रकाशितही होत गेल्या. त्यातलीच एक कंपनी होती फ्लीटगार्ड. या कंपनीच्या नावाने दिल्या जाणाऱ्या जाहिराती कशा असाव्यात यावर एकदा आम्ही चर्चा करत होतो. त्यावेळी पूर्वी अमेरिकेतील The Wall Street Journal ह्या प्रसिद्ध बिझनेस विकलीमध्ये मलपृष्ठावर सलग ७५ आठवडे आलेल्या एका जाहिरात-मालिकेबद्दल त्यांनी मला सांगितले. त्या जाहिरातींच्या त्यांच्या संग्रही असलेल्या काही छायाप्रतीही त्यांनी दाखवल्या. त्या प्रकाशित झाल्या तेव्हा त्या निनावी असायच्या; म्हणजे कुठल्याच कंपनीचे वा व्यक्तीचे नाव त्यावर नसायचे. तशा पंचाहत्तर जाहिराती प्रकाशित झाल्यानंतर वाचकांना वॉल स्ट्रीट जर्नलकडूनच समजले, की युनायटेड टेक्नॉलॉजीस ह्या ओटिस एलेव्हेटर आणि कॅरिअर एअर-कंडीशनर यांसारखी विख्यात उत्पादने तयार करणाऱ्या एका बड्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हॅरी ग्रे हे स्वतः त्या लिहीत असत. अगदी साधे पण त्यांच्या दृष्टीने अमेरिकन समाजासाठी महत्त्वाचे ठरतील असे काही विचार त्यातून कमीत कमी शब्दांत व्यक्त केले जात. उजव्या बाजूला फक्त एका छोट्या स्तंभाचा उभा मजकूर आणि उर्वरित पूर्ण पान कोरे अशी त्या मलपृष्ठांची आगळी, अत्यंत साधी मांडणी असे. साहजिकच १९७९ व १९८० या प्रकाशनकाळात यांतील प्रत्येक जाहिरात वाचकांचे लक्ष लगेच वेधून घेई. 'How we perform as individuals will determine how we perform as a nation' असे त्या सर्व जाहिरातींचे आधारसूत्र होते.

वॉल स्ट्रीटचा वाचक म्हणजे कमालीचा उच्चभ्रू. अमेरिकन उद्योगजगताचा अगदी अर्क. पण या चोखंदळ वाचकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद या जाहिरातींना मिळाला. अमेरिकन उद्योगजगतातील सर्वांत प्रभावी १०० जाहिरातींमध्ये या जाहिरातींचा समावेश केला गेला. *Gray Matter* ह्या नावाने पुढे या जाहिरातींचे एक संकलनही हॅरी ग्रे यांनी प्रसिद्ध केले.

या कल्पनेपासून प्रेरणा घेऊन अंतर्नादमधील या जाहिरात-मालिकेसाठी मजकूर लिहायचे मी ठरवले. मजकूर काय असावा याचे पूर्ण स्वातंत्र्य मला किर्लोस्करांनी दिलेच होते. मार्च २००४ ते डिसेंबर २००६ ह्या कालावधीत त्या अंतर्नादच्या मलपृष्ठावर प्रकाशित होत गेल्या. हे छोटे पुस्तक म्हणजे त्यांतील २४ जाहिरातींचे संकलन आहे. कंपनीचा लोगो वगळून ते प्रकाशित करायला फ्लीटगार्ड कंपनीने संमती दिली ह्याबद्दल मी कंपनीचा आणि अरुण किर्लोस्कर यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

‘नव्या जगाची सुरुवात स्वतःपासून होते’ हे सूत्र असलेल्या या जाहिरातींची ही पार्श्वभूमी आम्ही स्वतः कधी उघड केली नव्हती; पण पुढे ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी लोकसत्तेच्या एका अंकात (शनिवार, ४ जून २००५) या जाहिरात-मालिकेवरच ‘नव्या जगाची सुरुवात...’ या शीर्षकाचा जवळपास अर्धे पान व्यापणारा लेखच लिहिला व त्यामुळे ही पार्श्वभूमी व्यापक समाजापुढे आली. ‘सामाजिक संस्कारांची पखरण करणारी बोधमालिका’ अशा शब्दांत जोगळेकरांनी ह्या जाहिरातींचा गौरव केला होता. एका मोठ्या वृत्तपत्राने एखाद्या मासिकातील जाहिरातींवर एवढा विस्तृत लेख लिहिल्याचे हे बहुधा एकमेव उदाहरण असावे.

एका अर्थाने माझे सर्वसामान्य दैनंदिन जगण्याविषयीचे विचारच मी या जाहिरातींतून मांडले होते. अंतर्नादमधल्या कुठल्याही लेखनापेक्षा जास्त प्रतिसाद त्यांना मिळाला. ‘या जाहिराती मोठ्या करून आम्ही आमच्या नोटीस बोर्डावर लावत असू’, ‘त्याच्या फोटोकॉपी काढून सर्वांना वाटल्या’, ‘त्यामुळे मला जगण्याचं बळ मिळालं’, ‘आम्ही यापासून हे-हे शिकलो’, ‘असा एक अनुभव मलाही आला होता’ अशा प्रकारच्या असंख्य प्रतिक्रिया वाचकांकडून आल्या. या जाहिरातींच्याविषयी भरभरून बोलणारे कितीतरी वाचक आजही भेटतात.

या जाहिरातींचे एकत्रित संकलन प्रसिद्ध करावे अशी विनंती आमच्या अनेक वाचकांनी आम्हांला केली होती. दैनंदिन कामाच्या व्यापात तेव्हा ते जमले नाही; पण आज उशिरा का होईना पण त्या साऱ्यांची इच्छा पूर्ण होत आहे याचे समाधान वाटते. चौदा-पंधरा वर्षांपूर्वी जेव्हा या जाहिराती प्रथम प्रसिद्ध झाल्या, तेव्हा Whatsapp, फेसबुक वगैरे प्रकार आपल्याकडे फारसे प्रचलित नव्हते. त्या माध्यमांतून सुविचारांचा आज सगळीकडे नुसता पाऊस पडत असतो. पण अशा परिस्थितीतही एखादे विशिष्ट सूत्र असलेले, सोप्या शब्दांत मांडलेले आणि बहुतेकांना दैनंदिन जीवनात सहज आचरणात आणता येतील असे हे विचार आजही वाचकांना महत्त्वाचे असे काहीतरी देऊ शकतील असा विश्वास वाटतो. मुख्य म्हणजे नव्या जगाची सुरुवात करण्यासाठी कोणा महात्म्याची वाट बघत न बसता, स्वतःपासून सुरुवात करून, आपणही त्या निर्माणप्रक्रियेत अगदी खारीचा म्हणता येईल असा थोडासातरी वाटा उचलू शकतो, ही श्रद्धा त्यांच्या मनात ह्या वाचनातून बळावू शकते. म्हणूनच आज ही छोटी पुस्तिका वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

■

# अनुक्रमणिका


छोट्या छोट्या गोष्टी / ७
आठवतं, आयुष्यात पहिली मोठी संधी तुम्हांला कोणी दिली? / ८
ते आत्ताच करा / ९
प्रत्येक गोष्ट जागच्या जागी / १०
दिलेली वेळ पाळा / ११
कौतुकाचे दोन शब्द / १२
जगातली सर्वांत महत्त्वाची नोकरी / १३
थोडक्यात नेमकं / १४
आज उलटली साठी... / १५
भित्यापाठी ब्रह्मराक्षस / १६
*हम से आया न गया...* / १७
सर्वांत लाडका शब्द / १८
चलता है! / १९
प्लीज, थँक यू आणि सॉरी / २०
खरी जवळची कोण? / २१
पाठीवरती हात ठेवून फक्त 'लढ' म्हणा! / २२
युनिट्स आणि शेअर्सप्रमाणे मैत्रीतही गुंतवणूक हवी / २३
झाडावरची सगळी फळं स्वत:च खायची नसतात... / २४
वाचून दाखवा / २५
खूप पाणी रोप कुजवतं / २६
कमी बोला, जास्त ऐका / २७
डोळे आणि पापण्या / २८
एकेकटे आणि चारचौघे / २९
धागा तोडू नका, फुली मारू नका / ३०

# छोट्या छोट्या गोष्टी

आयुष्यातले मोठे मोठे सन्मान आपल्यापैकी बहुतेकांना
मिळवता येत नाहीत.
पद्मश्री, ज्ञानपीठ, एखाद्या खेळामधले सुवर्णपदक...
पण आयुष्यातले अनेक छोटे छोटे आनंद
आपल्यापैकी प्रत्येक जण मिळवू शकतो.

– मित्राने पाठीवर दिलेली थाप.
– शरदाच्या थंडीतली भाकर-लोणी-लसूणचटणी.
– गरमागरम चहा.
– मुंबईच्या लोकलमध्ये मिळालेली चौथी सीट किंवा
  डेक्कन जिमखान्यावर पार्किंगला मोकळी जागा.
– पाय भिजवून मागे परतणाऱ्या पुळणीवरच्या लाटा.
– पहाटवाऱ्याची शिरशिर आणि सूर्योदयाचे रंग.
– मूड पालटून टाकणारे आवडत्या गाण्याचे सूर.

छोट्या छोट्या बिजागिरींवर मोठे मोठे दरवाजे फिरतात.
तसेच छोटे छोटे आनंदही महत्त्वाचे असतात.
तीच माणसं, तेच प्रसंग, त्याच जागा मग वेगळ्या वाटू
लागतात.
दृष्टी बदलली की सृष्टीही बदलते.
आपली जीवनविषयक मतं ही खूपदा त्या विशिष्ट क्षणी
आपल्याला अंतर्यामी कसं वाटत असतं, यावर अवलंबून
असतात.
आधी आपण बदलतो,
मग जग बदलतं.

## आठवतं,
## आयुष्यात पहिली मोठी संधी
## तुम्हांला कोणी दिली?

तुमच्यातली ‘खास बात’ त्याने प्रथम हेरली.
तुम्हांला चांगला ‘ब्रेक’ दिला.
आज तुम्ही जे कोणी आहात
ते बऱ्याच अंशी त्याच व्यक्तीमुळे.
एखादा नातेवाईक, एखादा बॉस, एखादा शेजारी
किंवा एखादा मित्र.
ज्याने तुमच्या अडचणीच्या वेळी
स्वत:च्या खिशात हात घातला.
ज्याच्यात होती मदत करायची वृत्ती
आणि तुम्ही पुढे जाल हे हेरण्याची दूरदृष्टी.
दोन्ही गुण तसे दुर्मीळच.

पुढच्या चोवीस तासात एक नक्की करा.
दहा मिनिटं वेळ काढून त्या माणसाला पत्र टाका.
तुमची कृतज्ञता कळवा.
एक सुंदर नातं पुन्हा जिवंत होईल.

आणखीन एक गोष्ट.
दहा मिनिटं याचाही विचार करा,
की तुम्ही आज दुसऱ्या कोणाला असा ‘ब्रेक’ देऊ शकता,
असा कोण आहे
ज्याला आज तुम्ही मदत करू शकता.
काही वर्षांनी त्याच्याकडून तुम्हांलाही एक सुंदर पत्र मिळेल.
आयुष्यभर जपून ठेवावं असं एक पत्र.

## ते आत्ताच करा

जॉगिंगला जायचं आहे
दार्जिलिंगचा सूर्योदय बघायचा आहे
मुलांना मराठी नाटक दाखवायचं आहे
बंगाली शिकायचं आहे
जंगलात रात्र काढायची आहे
'माझं तुझ्यावर प्रेम आहे' हे तिला सांगायचं आहे
दासबोध वाचून काढायचा आहे
बेसिनमधला गळका नळ बदलायचा आहे
अलास्काला जायचं आहे
वडलांशी मनमोकळं बोलायचं आहे
वजन कमी करायचं आहे
शेअरबाजारात नशीब अजमावायचं आहे
वॉचमनला चांगलं झाडायचं आहे
ॲरोचे दोन शर्ट घ्यायचे आहेत
क्रॉसवर्डवर चक्कर मारायची आहे
आनंदवनात आमटेंना भेटायचं आहे
तलतची सीडी ऐकत रात्र जागवायची आहे
पहाटे पक्षी बघायला जायचं आहे...

जे करावसं खूप खूप वाटतं ते पुढे ढकलत राहू नका.
उद्या कदाचित उशीर झाला असेल.

## प्रत्येक गोष्ट जागच्या जागी

– माझा चष्मा कुठे गेला? इथेच कुठेतरी ठेवला होता.
– गाडीची किल्ली कुठे ठेवली आहेस? मला ऑफिसला उशीर होतोय.
– पिंकी, शाळेचा डबा काल कुठे टाकला होतास? स्कूलबस यायची वेळ झाली.
– दोन दिवस झाले, नेलकटर काही कुठे सापडत नाहीए.
– बाबा, माझी ओरिजिनल मार्कशीट कुठे ठेवली होती? सबमिट करायचा आज शेवटचा दिवस आहे.
– घड्याळाचं वॉरंटी कार्ड इथेच ठेवलं होतं. आता नाही सापडलं तर दुरुस्तीचा चार्ज भरावा लागेल.
– चार दिवस झाले, मॅरेज सर्टिफिकेट शोधतोय मी. पॉलिसीबरोबर जोडावं लागतं.
– कुठे गेलं ते प्रोजेक्ट प्रपोजल? आऊट-ट्रेमध्येच ठेवलं होतं.
– त्या ड्रॉइंगची अॅप्रुव्हड कॉपी कशी सापडत नाहीए?

जागच्या जागी न ठेवलेल्या गोष्टी शोधण्यात
आयुष्यातला कितीतरी अमूल्य वेळ
आपण खर्च करत असतो.
ही बाब वाटते तशी क्षुल्लक नाही.
नेपोलियनच्या पराभवाने युरोपच्या इतिहासाला निर्णायक कलाटणी मिळाली. आपल्या विजयाची दोन कारणं ड्यूक ऑफ वेलिंग्टनने दिली होती, असं म्हणतात.
एक, 'रणभूमीवर मी नेपोलियनच्या आधी अर्धा तास पोचलो,' हे कारण प्रसिद्ध आहे. दुसरं कारण फारसं माहीत नसतं. ते आहे : 'आमच्या प्रत्येक गोष्टीसाठी (सैन्य वा सामग्री) निश्चित जागा होती, आणि प्रत्येक गोष्ट आपापल्या जागी होती.'
("A place for everything and everything in its place.")

## दिलेली वेळ पाळा

एखाद्याचे पैसे उसने घेणं आणि परत न करणं
याला आपण फसवणूक म्हणतो.
दिलेली भेटीची वेळ न पाळणं हेही तेवढंच आक्षेपार्ह आहे.
किंबहुना थोडं जास्तच.
कारण, पैसे उशिरा का होईना, पण परत करता येतात
एखाद्याचा फुकट घालवलेला वेळ मात्र आपण कधीच परत
करू शकत नाही.

तीन वाजता येतो म्हटल्यावर
आपण ठीक तीनला हजर राहायलाच पाहिजे.
पाच मिनिटं उशीर झाला तरी तो उशीरच.
पडलीच आपल्या नावापुढे एक लाल फुली.

झेंडावंदनासाठी एक-एक, दोन-दोन तास बिचारी मुलं उन्हात
उभी असतात. अध्यक्ष उशिरा येतात म्हणून.

बंदोबस्तासाठी पोलिसांची तासन्तास रखडपट्टी होते आणि
अचानक मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम बदलतो.

जेवढा गायक मोठा तेवढा तो श्रोत्यांना जास्त ताटकळत
ठेवतो.

हे सगळं बदलायला हवं.
ठरलेल्या दिवसापूर्वी मालाची डिलिव्हरी झाली नाही, तर वॉल
मार्टसारखी कंपनी लक्षावधी डॉलर्सची ऑर्डर कॅन्सल करते.
सर्जन ऑपरेशन थेटरमध्ये उशिरा आला तर अमेरिकेतला रोगी
त्याला कोर्टात खेचू शकतो.

दिलेली वेळ पाळणं याचाच अर्थ दिलेला शब्द पाळणं.
आणि आपल्या शब्दाची किंमत
म्हणजेच आपली स्वत:ची किंमत.

## कौतुकाचे दोन शब्द

एक गृहस्थ एकदा सांगत होते,
''माझी आई अतिशय उत्तम स्वैपाक करायची. अख्ख्या पंचक्रोशीत तिचा हात धरणारं कोणी नव्हतं. गावात कोणाकडेही काही विशेष कार्य असलं, की स्वैपाकासाठी तिला बोलावलं जायचं. सगळे तिच्या स्वैपाकाची फार स्तुती करायचे. पण मरतेवेळी आई मला काय म्हणाली होती, ठाऊक आहे?
– 'बाळा, आयुष्यभर मी सगळ्या गावाकडून स्तुती ऐकली. पण तुझे बाबा काही आयुष्यात कधी म्हणाले नाहीत, की तू चांगला स्वैपाक करतेस म्हणून! त्यांच्याकडून हे चार शब्द ऐकायला मी आयुष्यभर आसुसलेले होते. पण तुझा बाप मरेस्तोवर एकदाही हे एवढं बोलला नाही!'
हे शल्य उराशी घेऊनच शेवटी त्या बाई वारल्या.

कौतुकाचे चार गोड शब्द.
ते बोलायला ना त्रास पडतो, ना खर्च येतो.
पण प्रामाणिकपणे, वेळच्या वेळी उच्चारले
तर केवढा आनंद निर्माण करतात ते.

आणि आळसापोटी वा अहंकारापोटी वा उदासीनतेपोटी ते बोलायचं टाळतो,
तेव्हा आपण अकारण किती दुःख निर्माण करतो!

## जगातली सर्वांत महत्त्वाची नोकरी

या नोकरीत
काय काय करावं लागत नाही?
साफसफाई.
वीणकाम. शिवणकाम. सजावट.
स्वयंपाक.
बालसंगोपन. औषधपाणी. वृद्धसेवा.
हिशेबलेखन. बाजारहाट. खरेदी.
शृंगार.
शिकवणी. पूजा. प्रार्थना. बागकाम.
शांतता आणि सुव्यवस्था.
वाचन. लेखन. गायन.
करमणूक. संस्कृतिरक्षण.
अग्निशमन!
पॅकिंग आणि डिसपॅच.
जनसंपर्क.
वाहतूक. गुंतवणूक. बँकिंग. अर्थकारण.
पर्यटनव्यवस्था. ऊर्जाबचत.
नियोजन. कायदापालन.
इव्हेन्ट मॅनेजमेंट.
दारूबंदी!
जलसंधारण.
व्यवस्थापन.
बिनखात्याची सर्व कामं.

ही सगळी कामं
वर्षानुवर्षं सांभाळणारी व्यक्ती
खरोखरच ग्रेट असली पाहिजे.
तशी ती आहेच.
तिचं नाव आहे –
गृहिणी!

## थोडक्यात नेमकं

तीन वाजता वैशालीसमोर.
पैसे संपले.
भारत जिंकला.
सचिन आउट.
ये. बस. जेव.
नोकरी मिळाली.
हात नको लावूस अंगाला.
आई गेली रे.
गाडी चुकली.
देशमुख नवे मुख्यमंत्री.

आयुष्यातलं बरंच काही सांगता येतं
थेट आणि थोडक्यात.

'प्रणयाराधना'पेक्षा प्रेम सोपं आहे.
'संपन्न होईल' नको,
फक्त 'होईल.'
'दीपप्रज्वलन' नका करू,
'समई लावा.'
'स्थानापन्न' नका होऊ,
'बसा.'
'अभिभाषण' म्हणजे फक्त 'भाषण.'
'एवंगुणविशिष्ट' म्हणजे फक्त 'असं.'
भावानोद्दीपक पर्युत्सुक मूलतत्त्ववादी, आतंकवादी
तथा नववसाहतवादी परिप्रेक्ष्यातील आरक्षित
अभिजनवर्गाचे प्राप्य पर्यावरणातील
पुनर्मूल्यांकित अभिसरण प्राय: निर्गमन सकृतदर्शनी
चलनवृद्धिनियमनासाठी प्रार्थनीय नाही...

असलं काहीही टाळा, गाळा.

विख्यात अमेरिकन नाट्यनिर्माता डेव्हिड बेलॅस्को म्हणाला
होता,
''तुम्हाला काय म्हणायचं आहे ते माझ्या व्हिजिटिंग कार्डाच्या
मागच्या बाजूवर लिहिता आलं पाहिजे.''

## आज उलटली साठी...

कॉर्पोरेशनच्या बागेत
किंवा फुटपाथवरच्या बाकड्यांवर
घरात बिछान्यावर
किंवा टिव्हीसमोर
'काय झालंऽऽ, वऽऽय झालं'च्या तालावर
केवढी मोठी संपत्ती वाया चाललेली असते.

सेवानिवृत्त चर्चिलला पंतप्रधान बनवलं गेलं,
तेव्हा त्याचं वय होतं ६७
त्याने कर्तृत्वाचा कळस गाठला त्यानंतर सहा वर्षांनी
१९४५ साली, जेव्हा इंग्लंडने महायुद्ध जिंकलं.

तरुणाईचं सध्या जास्तच स्तोम माजवलं जातंय का?

उतारवयातच वेळ असतो
आयुष्यात राहून गेलेल्या गोष्टी करण्यासाठी.
निवृत्ती नोकरीतून असते, जीवनातून नव्हे.
नवीन भाषा शिकणं, कला शिकणं
दुसऱ्याला शिकवणं, सांभाळणं, घडवणं
शेअर्स विकणं, घेणं
प्रवास करणं, चित्रं काढणं, वाचन करणं,
आणि कुणी सांगावं,
आवडीतून अचानक दुसरी करीअरही सापडणं
नवी जोडीही जमून जाणं.

रोज सकाळी उठतो तेव्हा परमेश्वर आपल्या हाती
लख्ख कोरे चोवीस तास ठेवत असतो.
जणू एखादा कोरा चेक.
त्यावरचा आकडा ज्याचा त्यानेच भरायचा असतो.

आयुष्यातला सर्वोच्च समाधानाचा दिवस
अजून उगवायचा आहे.

*आज उलटली साठी...*
*अजून चाळीस अपुल्या हाती!*

## भित्यापाठी ब्रह्मराक्षस

— आई, मी नाही जाणार त्या खोलीत
तिकडे काळोख आहे!

— मी नाही जाणार शाळेत
टीचर मारतात!

— हा ड्रेस घालून कॉलेजात?
सगळे हसतील!

— युपीएससीला बसा?
आमच्यासारख्यांना कुठे जमणार ते!

— मी नाही बदलणार फ्यूज
उगाच शॉक बसला म्हणजे!

— आपण नाही करणार रक्तदान
इन्फेक्शन झालं तर!

— जखमी माणसाला हॉस्पिटलमध्ये पोचवायचंय?
चल फुटू या, उगाच पोलिसांचं लफडं नको!

— नको बुवा ती पाणीपुरी
कावीळ व्हायची!

— पाचशेला घेणार तो शेअर?
डुबायचं आहे का!

— बससाठी दोन तास गेलेले परवडले
लोकलमध्ये चढणं जमणार नाही!

— चारधाम यात्रा? या वयात?
झेपणार नाही!

एक ना दोन, हजार गोष्टींची भीती!
आयुष्य छोटं करणारी.

एव्हरेस्ट जिंकणारा एडमंड हिलरी म्हणायचा,
'आपण डोंगर नाही जिंकत, स्वत:ला जिंकतो.'
('We don't conquer mountain, we conquer ourselves.')

## *हम से आया न गया...*

तो तिचा सख्या मुलगा
पुरे नऊ महिने पोटात वाढवलेला
मोठा झाला, प्रेमात पडला.
आई म्हणाली, 'दाखव तरी मुलगी.'
म्हणाला, 'दाखवतो, पण तू नाही म्हणालीस
तरी मी तिच्याशीच लग्न करणार.'
झालं! आईला तो अपमान वाटला.
'एवढी तुला माझी किंमत नाही?'
'एवढा तुझा माझ्यावर विश्वास नाही?'
शब्दांनी शब्द वाढत गेला.
दुसऱ्याच दिवशी त्याने घर सोडलं.
आयुष्यात पुन्हा कधीही घरी परतला नाही.
प्रश्न तत्त्वाचा होता! मराठी बाणा!

अधूनमधून तिला वाटायचं, जाऊ या त्याच्या घरी.
पण मग वाटायचं, त्याने नको आधी यायला?
अधूनमधून त्यालाही वाटायचं, जाऊ या आईकडे.
पण मग वाटायचं, तिने नको आधी बोलवायला?
कोणीच नमतं घेतलं नाही.
तो कधीच गेला नाही, तिनेही कधीच बोलावलं नाही.
दोन वर्षांपूर्वी ती वारली.
गेल्या महिन्यात तोही गेला.
अगदी आजोबा होऊन.

*हम से आया न गया*
*तुम से बुलाया न गया*
*फासला प्यार में*
*दोनों से मिटाया न गया...*

आयुष्यात अनेक नाती अशी उगाचच तुटतात.
तसा गंभीर गुन्हा कोणीच केलेला नसतो.
पण प्रश्न असतो, पहिलं पाऊल कोणी उचलायचं?

नातेवाईक, शेजारी, मित्र, सहकारी
रक्ताचा, लांबचा, जवळचा, मानलेला...
पण आता दुरावलेला...

तुम्ही उचलाल पहिलं पाऊल?

## सर्वांत लाडका शब्द

— कोण आहे रे तिकडे?
एकेकाळी सेवकांना बोलावत.
आज सरदार-पाटील नाहीत.
पण सेवा पुरवणारे आहेतच.
तीन 'वाल्यांनी' दिवस उजाडतो.
दूधवाला, पेपरवाला, कचरेवाला.
रोजच्या संबंधातील माणसं.
पण त्यांची नावं सांगता येतील?
किंवा लिफ्टमन, पोस्टमन, वॉचमन यांची?
तीही रोजच्या संपर्कातलीच.
तीच गोष्ट नेहमीच्या दुकानदाराची
भाजीवाल्याची. रिक्षावाल्याची.
शेजाऱ्यापाजाऱ्यांची.
— तोऽ, निळा टी-शर्टवाला...
— तेऽ, पहिल्या मजल्यावरचे टक्कलवाले...
अशी ओळख कशाला?

नावं लक्षात ठेवा.
आवश्यक वाटल्यास लिहून ठेवा.
नाव म्हणजे प्रत्येकाची स्वत:ची पहिली ओळख.
एखाद्याचं नाव घेणं म्हणजे,
विशिष्ट व्यक्ती म्हणून त्याची दखल घेणं.
सहा जणांच्या चिनी शिष्टमंडळाने
वॉशिंग्टनला भेट दिली.
एकालाही हेन्री किसिंजर पूर्वी कधी भेटले नव्हते.
पण विमानतळावर स्वागत करताना
त्यांनी प्रत्येकाचं नाव अचूक उच्चारलं.
व्हिसा-अर्जांवरून केलेला गृहपाठ.
'पिंग पाँग डिप्लोमसी'ची आणि एका नव्या कालखंडाची
ती सुरुवात होती.

ए पेपरवाला, ए वॉचमन... ऐवजी
मारुती, गजानन... अशी हाक मारली तर?
काही फरक पडेल?

# चलता है!

जरा जोरात धावला असता
तर सहज बॉल अडवू शकला असता
अगदी विनाकारण चार धावा सोडल्या.
चलता है! काय एवढा फरक पडतो चार धावांनी!

मला अगदी पाठ होतं ते उत्तर
जरा नीट नजर टाकली असती
तर माझी चूक माझ्या नक्की लक्षात आली असती.
जाऊ दे, दोन मार्कांचाच तर प्रश्न होता!

पिन कोड आहे काही तरी
पण चालतो नाही लिहिला तरी
त्याशिवायसुद्धा पत्रं हमखास मिळतात आम्हांला.

हेल्मेट समोरच होतं
पण म्हटलं कशाला उगाच लोढणं बरोबर
इथे कोपऱ्यावरच तर जायचं आहे.
चलता है!

खरंच चलता है?
चार काय, एखाद्या धावेकरतादेखील
आपण सामना हरू शकतो.
एखाद्या मार्काकरता ॲडमिशन हुकते.
पिनकोडविना पत्र मिळायला खूप उशीर होऊ शकतो.
ते पत्र नोकरीसाठीचं कॉल लेटरही असू शकतं.
आणि अवचित 'तो' क्षण येतो.
तेव्हा हेल्मेट नसल्यामुळे...

जरासा गाफीलपणा, दुर्लक्ष, आळशीपणा
कधीकधी खूप महाग पडतो.

कारखान्यातला कामगार असो वा बँकेतला क्लार्क
मेकॅनिक असो वा मॅनेजर
कलाकार असो वा मंत्री
'चलता है' हा दृष्टिकोन
प्रगतीच्या मार्गातला सर्वांत मोठा अडसर आहे.

## प्लीज, थँक यू आणि सॉरी

‘मला दे ना, प्लीज’
‘माहिती दिल्याबद्दल थँक यू’
‘सॉरी, पण लगेच नाही’
रोजच्या संभाषणातली वाक्यं.
पण ‘त्या’ छोट्या इंग्रजी शब्दांमुळे
‘सुसंस्कृत’ बनलेली.
त्यांच्या जागी ‘कृपया, धन्यवाद, क्षमस्व’
म्हणता येईल
पण ‘आपले’ असूनही ते शब्द
स्वाभाविक नाही वाटत, खरं ना?
या तीन इंग्रजी शब्दांना सुटसुटीत
असे प्रतिशब्द आपल्याकडे नाहीत.
खरं तर, असलं काही म्हणायची
पद्धतही आपल्याकडे फारशी नाही.

शिष्टाचार म्हणजे दैनंदिन जीवनात
सहजगत्या व्यक्त होणारी संस्कृती.
यात कृत्रिमता वा औपचारिकता,
खोटेपणा वा नाटकीपणा काय आहे?
उलट दुसऱ्याविषयी आदर,
संवेदनशीलता आहे.
क्षुल्लक वाटणाऱ्या अशा
असंख्य छोट्या-छोट्या पाकळ्यांचा कांदा
म्हणजेच शेवटी संस्कृती.
आपण पाश्चात्त्यांचे शर्ट-पँट, बूट-मोजे घेतले
पेन-पेन्सिलपासून मोबाइल-इमेलपर्यंत
अगणित शब्द उचलले.
मग ‘प्लीज, थँक यू आणि सॉरी’ हेदेखील
आपलेच शब्द म्हणून मराठी माणसाने
स्वीकारायला आणि सर्रास वापरायला,
काय हरकत आहे?

## खरी जवळची कोण?

मालकीणबाई एकट्याच राहायच्या प्रशस्त बंगल्यामध्ये.
मुलगा-सून प्रचंड शिकलेले.
खोऱ्याने पैसे ओढत होते.
अमेरिकेत.
यजमान तीन-चार वर्षांपूर्वीच गेले होते.
पत्नीच्या शेवटच्या दिवसांची भरपूर सोय करून.
मालकीणबाईंची सेवाशुश्रूषा, जेवणखाण,
आला-गेला, घरकाम
सगळं काही शांताबाईच करायच्या.
केवळ पगारासाठीच नाही,
मनापासून, मायेने.
आजूबाजूची माणसंही मालकीणबाईंचं करायची.
माळी बागकामाबरोबर बाजारहाटही करायचा.
मालकिणीला आवडेल ते नेमकं आणायचा.
आणि एकदा बीपी वाढलं तेव्हा
वॉचमनच धावत जाऊन डॉक्टरना
घेऊन आला होता.
गेल्या महिन्यात मालकीणबाई वारल्या
तेव्हा उशाशी शांताबाईच होत्या.
त्यांनीच तर सगळी फोनाफोनी, धावपळ केली.

मग यथावकाश अमेरिकेहून मुलगा-सून आले.
पंधरा दिवसांची रजा काढून.
अंत्यविधी, मृत्युपत्र वगैरे सोपस्कार...
मुलाने मोठ्या उदारपणे
शांताबाईंना ५०१ रुपये दिले! शिवाय एका महिन्याचा पगार!
आणि वर मालकीणबाईंच्या चार साड्याही!
माळ्याला दोनशे, वॉचमनला शंभर.
आणि एका अनाथाश्रमाला हजार!
म्हणे आईला समाजकार्याची आवड होती!!

मग मृत्युपत्रात आईने ठेवलेला बंगला त्यांनी
दोन कोटीला विकला,
आणि बरोब्बर पंधराव्या दिवशी
दोघं अमेरिकेला परतली.
नेहमीप्रमाणे बिझिनेस क्लासने.

## पाठीवरती हात ठेवून फक्त ‘लढ’ म्हणा!

‘भाई’ला गजाआड डांबणारा इन्स्पेक्टर
आडगावचा नेक शाळामास्तर
जखमींना दवाखान्यात पोचवणारा अजनबी
भ्रष्ट मंत्र्याला ‘पोचवणारा’ अधिकारी
विसरलेली बॅग परत करणारा रिक्षावाला
कधीही वेळ न चुकवणारा दूधवाला
कंपनी चेअरमनवर केस टाकणारा पर्यावरणी
मौलवींना न जुमानणारी तरुणी

प्रलोभने टाळणारे
भीती दूर सारणारे
अशा एखाद्याविषयी
वाचलं असेल, ऐकलं असेल

एक कराल?
त्याचा पत्ता शोधा
आणि एक पोस्टकार्ड टाका
अधिक काही करा,
वा नका करू
तुमची मर्जी
पण निदान एवढं करा.
उत्तेजनाचा एखादा शब्द, बस्स!

निर्मळ मनानं चांगलं करणाऱ्याची
अधिक काही अपेक्षाही नसते
कुसुमाग्रजांच्या कवितेतल्या त्या पूरग्रस्ताप्रमाणेच.

## युनिट्स आणि शेअर्सप्रमाणे मैत्रीतही गुंतवणूक हवी

मित्र कधी कधी मैत्र विसरतात
दुखवतात, दुखावतात
जिव्हारी घाव घालतात
सोयीचं मौन पाळतात
तरीही मित्र हवेच असतात.
आपण एकटे येतो, एकटे जातो
पण म्हणूनच मधल्या प्रवासात
दुकटेपणाची ओढ असते.
म्हणूनच नातीगोती हरवलेल्या अमेरिकेत
'फ्रेंड्स'सारखी टीव्ही मालिका
सर्वाधिक लोकप्रिय ठरते.

जमलं तर आज एक यादी कराल?
जवळचे म्हणता येतील अशा मित्रांची
ज्यांच्या घरी तुम्ही कधीही जाऊ शकता
गप्पा छाटायला, चहाला
ही यादी जेवढी मोठी
तेवढेच आपण श्रीमंत.

अशी मैत्री जोपासावी लागते
म्हातारपणासाठी आपण गुंतवणूक करतो
मैत्रीसाठीही गुंतवणूक करावी लागते.
वेळ द्यावा लागतो.
प्रयत्न करावे लागतात.
त्यात कृत्रिम-वावगं काहीच नसतं.
बागेतल्या रोपांना खत-पाणी द्यावंच लागतं
पण म्हणून फुलांची टवटवी कोणी
कमी नाही लेखत.
संध्याकाळच्या उंबरठ्यावर मैत्रीची चार फुलं
हाताशी नसतील
तर आपण दरिद्रीच.
बँकबॅलन्सच्या आकड्यापुढे पूज्यं कितीही असली तरी.

## झाडावरची सगळी फळं स्वत:च खायची नसतात...

विनोबाजी म्हणत,
माझी भाकरी मी खायची, तुझी तू
ही प्रकृती.
माझी भाकरी मी खायची, शिवाय तुझी हिरावून घ्यायची
ही विकृती.
आणि तुझी भूक जास्त म्हणून
माझी अर्धी भाकरी मी तुला द्यायची
ही संस्कृती.
या व्याख्येत आपण कुठे बसतो?

जागतिकीकरण म्हणजे स्पर्धेचा जमाना
सर्वांत जास्त लायक तोच तगेल
सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट!
पण आपण सगळेच
कुठल्या ना कुठल्या बाबतीत
अनफिट असतो.
म्हणून काय –

मी-मला-माझ्यापुरता
याच्यापलीकडेच समाज असतो.
वेड्या-मागासलेल्या भावाला
काठावर पास होणाऱ्याला
कशीबशी नोकरी करणाऱ्याला
आपल्यातच सामावून घ्यायचं असतं.
चपळाईने गाडीत चढणाऱ्याने
इतरांसाठी कधी कधी
विंडोसीट सोडायची असते.
आजी-आजोबांना रस्ता
ओलांडता यावा म्हणून
मोटारवाल्याने थांबायचं असतं.
झाडावरची सगळी फळं
स्वत:च खायची नसतात...
काही थोडी पक्ष्यांसाठीही
मागे सोडायची असतात.

## वाचून दाखवा

टीव्हीवर कार्टून बघणं
वा कंप्यूटरवर गाणी लावणं
यात गैर काहीच नाही
पण शेजारी बसून
मुलांना काही वाचून दाखवण्यात
वेगळाच आनंद आहे.

मध्येच घाबरून धरलेलं बोट
प्रेमानं गोंजारणारा हात
आणि ऐकता ऐकता लागलेली झोप
स्वप्नभूमीत अलगद नेणारी.

वाचून दाखवण्यातून,
शब्द, सूर, स्पर्श, अभिनय
या सगळ्यातून,
खूप काही साधतं
पॉकेट मनी आणि लठ्ठ फिया
यांच्यापलीकडचं काही मिळतं
एक नातं, एक जवळीक...

अर्थात हे फक्त मुलांपुरतंच नाही
मोठ्यांनीही असं काहीतरी
रोज एकमेकांना वाचून दाखवावं
किस्सा, गोष्ट, बातमी, आठवण...
आणि केवळ भाषा व उच्चार
सुधारण्यासाठी नाही.

आधुनिक घरातून ही परंपरा
जणू हद्दपार झाली आहे
ती पुन्हा रुजवायला हवी

नाहीतर एक दिवस
घरातल्या घरातसुद्धा आपण एकमेकांना
एसएमएस पाठवत राहू!

## खूप पाणी रोप कुजवतं

प्रेमाचं पांघरूण घाला
पण दृष्टीच झाकू नका

अळीचा कोष
अळीनेच स्वबळावर फोडावा
प्रेमापोटी, मदत म्हणून,
दुसऱ्या कुणी फोडला
तर आतलं फुलपाखरू
अपंगच जन्मेल
उडायचंच नाही

शाळेत सोडण्यापासून
प्रोजेक्ट करण्यापर्यंत
मुलगी शोधण्यापासून
पुढे त्यांची मुलं सांभाळण्यापर्यंत
मुलांच्या सगळ्याच लढाया
आपणच लढू नये

चटके बसल्याशिवाय
अपमान पचवल्याशिवाय
वाढ अपुरीच राहते

आयत्या सुखाला किंमत नसते
स्वकष्टाची भाकरीच गोड लागते

शिक्षण द्या, संस्कार द्या
अडचणीला आधार द्या
पण आयुष्यभर मुलं बसून खातील
इतकं मागे ठेवूच नका

अती प्रेम पंगू बनवतं
खूप पाणी रोप कुजवतं

## कमी बोला, जास्त ऐका

प्रत्येकाला देव देतो
दोन कान, एक तोंड
जणू तो सांगत असतो
कमी बोला, जास्त ऐका
पण ऐकतो कोण!

ऐकण्याचीही कला असते
बोलण्यातले पूर्णविराम, स्वल्पविराम
खूप काही सांगतात.
संभाषणातले नि:शब्द क्षणही
बोलके असतात.
बोलीपेक्षा देहबोली जास्त सांगते.
ऐकायला पाहिजे.

कुठेही जा,
लोक आपले बोलतच असतात
ना घड्याळाकडे लक्ष
ना समोरच्याच्या चुळबुळीकडे.
सांगायचं सगळं संपलं,
तरी बोलणं संपतच नाही.
घर असो की रस्ता
कार्यालय वा कट्टा
टकळी चालूच.
आपल्याइतका गोंगाट
जगात कुठेच नसावा!

शिकायला हवं
ऐकणं
जेवढं बोलू
त्याच्या दुप्पट ऐकणं
बाकी काही नाही तरी
गोंगाटतरी कमी होईल.

## डोळे आणि पापण्या

‘त्याचं काही सांगू नका...’
‘अंदर की बात वेगळीच आहे...’
दबक्या आवाजातली कुजबूज
कधी छद्मी हास्य...

वाईट ते आपल्याला पटकन दिसतं
काहींना फक्त तेवढंच दिसतं
‘कृष्ण’भक्तीचा रोगच तो.
पण दुसऱ्याला खाली खेचून
आपण वर उठत नाही.

शेवटी प्रत्येक माणूस
एक पॅकेज डील आहे
भलं-बुरं, कडू-गोड
दोन्ही आहे.
चांगलं ते बघावं
म्हणजे ते वाढतं,
टीकेपेक्षा शाबासकी
जास्त साधते.

एकसारखे दोष काढत बसू नये
विशेषत: जवळच्या माणसांचे.
ज्याला आपलं मानलं
तो दोषांसकटच आपला बनतो.
बघणं महत्त्वाचं,
पण दुर्लक्ष करणंही महत्त्वाचं.
देवाने डोळे दिलेत
तशा पापण्याही दिल्यात
डोळ्यांचा वापर हवाच
पण कधी कधी
पापण्याही वापरायला हव्यात.

## एकेकटे आणि चारचौघे

'दादा, येताना आमच्यासाठीही चार लिंबं आणा'
'आणि आमच्यासाठी एक नारळ...'
बाजारात जायला बाहेर पडलं की
एकमेकांना हक्काने सांगत शेजारी.
कारण बाजार तसा लांब होता
चार रस्ते ओलांडावे लागत.

आज कोणालाच कशासाठी
काही सांगावं लागत नाही
कोणी कोणाला सांगतही नाही
लग्नातसुद्धा नातेवाईक शोभेपुरतेच लागतात.
सगळ्याचीच कॉंट्रॅक्ट देता येतात
सगळेच स्वावलंबी
आत्ममग्न, आत्मतृप्त
आपापल्या बेटावर.
आजचा समाज म्हणजे
खरंच *लोनली क्राउड!*

आज एक करून बघा
आपापल्या घरी मॅच वा सिरियल बघण्यापेक्षा
दुसऱ्या कोणाकडेतरी जाऊन बघा.
थेटरमध्ये जातानाही
'हम दो – हमारा एक'पेक्षा
ग्रुपनी गेलं तर?
प्रवास असो वा खरेदी
एकेकट्यापेक्षा सोबत बरी.
कविता एकेकट्यानेच वाचावी-अनुभवावी
पण चारचौघांत त्यावर बोलावंही.

जगात येताना-जाताना आपण एकेकटेच असतो
म्हणून तर मधल्या प्रवासात
चारचौघांची, ओढ लागते
सहवास जगण्यातली गोडी वाढवतो.

पण मैत्रीचे पूल
आपले आपणच बांधावे लागतात
त्याचं कॉंट्रॅक्ट नाही देता येत!

## धागा तोडू नका, फुली मारू नका

एकही डाग नसलेली सफरचंदं
सापडणं कठीण आहे
तशी ती नसतातच
पण थोडेफार डाग असलेली,
टाकून द्यायची नसतात
जरा साल काढून घेतली
तर आतून ती चांगलीच असतात
माणसांचंही तसंच असतं
थोडंफार वगळलं तर,
बरंचसं चालण्यातलं असतं
एवढ्यातेवढ्यावरून
फुली नसते मारायची
इतरांवर, वा स्वत:वरही
तोडून नसतं टाकायचं
इतरांपासून आपल्याला
वा आपल्यापासून आपल्याला
तोडणं सोपं असतं, पण पुन्हा जोडणं कठीण असतं
आणि मग कितीही जोडलं
जखम भरली, खपली धरली
तरी व्रण कायमच राहतो
तुटलेला धागा जोडला
तरी गाठ कायमच राहते
रोज-रोजच्या जगरहाटीत
तुमच्या आमच्या दिवसरातीत
जास्तीत जास्त ताण-ताप
चलनवाढ आणि तेलटंचाई
जिहाद आणि जंगलकटाई
यातून नाही येत
तो येतो, तू-तू, मी-मीतून
नात्यागोत्यांतल्याच गाठींतून
त्यावरच ठरतो आपला खरा मूड
तो चांगला असेल तर भोवतालचं जगही
अधिक चांगलं दिसायला लागतं
दृष्टी बदलली की सृष्टीही बदलते
आधी आपण बदलतो, मग जग बदलतं.

# भानू काळे

**प्रमुख प्रकाशित पुस्तके :**

- ***तिसरी चांदणी*** : राजकीय पार्श्वभूमीवरील कादंबरीलेखन स्पर्धेतील पारितोषिकविजेती कादंबरी, पहिली आवृत्ती : *मॅजेस्टिक प्रकाशन,* मार्च १९७९, दुसरी आवृत्ती, *मौज प्रकाशन,* नोव्हेंबर २०१३
- ***कॉम्रेड*** : कामगारचळवळीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी, पहिली आवृत्ती : *ग्रंथाली प्रकाशन,* जून १९८९, दुसरी आवृत्ती : *मौज प्रकाशन,* नोव्हेंबर २०१३
- ***बदलता भारत*** : जागतिकीकरणाच्या लाटेत बदलणाऱ्या – तसेच न बदलणाऱ्या – भारताचा प्रवासवर्णनाच्या माध्यमातून घेतलेला शोध, *मौज प्रकाशन,* ऑगस्ट २००५ (सध्या पाचवी आवृत्ती) (२००५ सालचा पु. ल. देशपांडे स्मृती पुरस्कार, २००६ सालचा केशवराव कोठावळे स्मृती पुरस्कार, २०११ सालचा पुणे मराठी ग्रंथालयाचा न. चिं. केळकर पुरस्कार)
- ***अंतरीचे धावे...*** : विविध सामाजिक-सांस्कृतिक विषयांवरील लेखांचा संग्रह, (सध्या तिसरी आवृत्ती) *मौज प्रकाशन,* जून २००९
  (२००९ सालचा पुणे नगर वाचन मंदिर पुरस्कार, २०१० सालचा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट ललित ग्रंथासाठीचा पुरस्कार)
- ***रंग याचा वेगळा... दत्तप्रसाद दाभोळकर लेखन आणि जीवन*** : (संपादन व प्रस्तावना), *कॉन्टिनेन्टल प्रकाशन,* पहिली आवृत्ती ऑगस्ट २०१४
- ***अजुनी चालतोची वाट... रावसाहेब शिंदे जीवन आणि कार्य*** : *ऊर्मी प्रकाशन,* पहिली आवृत्ती डिसेंबर २०१४ (सध्या पाचवी आवृत्ती)
- ***अंगारवाटा... शोध शरद जोशींचा*** : ऊर्मी प्रकाशन, डिसेंबर २०१६ (सध्या दुसरी आवृत्ती)

**संकीर्ण :**

- १९७८ ते १९९४ अशी सोळा वर्षे मुंबईला मुद्रणव्यवसायात. १९९५मध्ये पुण्याहून *अंतर्नाद* या वाङ्मयीन-वैचारिक मासिकाची सुरुवात.
- शंकरराव किर्लोस्कर प्रतिष्ठान, प्रभाकर पाध्ये प्रतिष्ठान, पु. भा. भावे स्मृती समिती, मुंबई मराठी पत्रकार संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद व अन्य अनेक प्रतिष्ठित संस्थांच्या पुरस्कारांनी सन्मानित
- अध्यक्ष, समरसता साहित्य संमेलन, इचलकरंजी, २००८
- भाऊसाहेब थोरात स्मृती पुरस्कार, जानेवारी २०१४
- *Change for Better* या एमकेसीएल-प्रकाशित इंग्रजी त्रैमासिकाचे संस्थापक-संपादक
- अनेक सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध.

‘अंतर्नाद’ मासिकाने आपल्या तेवीस वर्षांच्या वाटचालीत जे अनेक उपक्रम राबवले त्यातला एक म्हणजे ‘नव्या जगाची सुरुवात स्वतःपासून होते’ ही अभिनव जाहिरात-मालिका.

चौदा-पंधरा वर्षांपूर्वी जेव्हा या जाहिराती प्रथम प्रसिद्ध झाल्या, तेव्हा Whatsapp, फेसबुक वगैरे प्रकार आपल्याकडे फारसे प्रचलित नव्हते. त्या माध्यमांतून सुविचारांचा आज सगळीकडे नुसता पाऊस पडत असतो. पण अशा परिस्थितीतही एखादे विशिष्ट सूत्र असलेले, सोप्या शब्दांत मांडलेले आणि बहुतेकांना दैनंदिन जीवनात सहज आचरणात आणता येतील असे हे विचार आजही वाचकांना महत्त्वाचे असे काहीतरी देऊ शकतील असा विश्वास वाटतो. मुख्य म्हणजे नव्या जगाची सुरुवात करण्यासाठी कोणा महात्म्याची वाट बघत न बसता, स्वतःपासून सुरुवात करून, आपणही त्या निर्माणप्रक्रियेत अगदी खारीचा म्हणता येईल असा थोडासातरी वाटा उचलू शकतो, ही श्रद्धा त्यांच्या मनात ह्या वाचनातून बळावू शकते. म्हणूनच आज ही छोटी पुस्तिका वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.